नियमित फौजदारी खटला नं. १५११/२०२५
निशाणी-२३

**सदर साक्षीदाराची साक्ष व्ही. सी. द्वारे नोंदविण्यापूर्वी आवाज स्पष्टपणे येत असल्याची व चित्रफीत व्यवस्थीत दिसत असल्याबाबतची खात्री केली त्यानंतर साक्षीदाराचा जबाब नोंदविण्यास ०१.१५ वा. सुरुवात केली आणि ०१.३० वा. जबाब नोंदवुन पुर्ण झाला.**

अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. ५ चा जबाब.

मी शपथेवर कथन करतो की,
माझे नांवः- शैलेश भटु पाटील
वयः- ४१ वर्षे, पदः- पो. उ. नि
नेमणुक - इगतपुरी पोलीस स्टेशन, इगतपुरी

सरतपास शपथेवर अभियोग पक्षातर्फे सहा. सरकारी वकील श्रीमती सीमा शेख यांचेकडूनः-

१. सन २०२४ मध्ये मी तोफखाना पोलीस स्टेशन येथे पो. उ. नि. या पदावर कार्यरत होतो. पोलीस ठाणे अमंलदार यांनी फिर्याद नोंदवुन सदर गुन्हा रजि. नं. ८७२/२०२४ दाखल करुन बी. एन. एस. ३०४ प्रमाणे गुन्हयाचा तपास माझ्याकडे दिला. आता मला दाखविलेला आदेश तोच आहे. त्यावर ठाणे अमंलदार यांची सही आहे. त्यास नि.२४ देण्यात येते. त्यासोबत मला फिर्याद, एफआयआरची प्रत, दैनिक अहवाल देण्यात आला. सदर फिर्यादचे अवलोकन करुन तपास सुरु केला. फिर्यादीने घटनास्थळ दाखविले. मी दोन पंचा समक्ष घटनास्थळ पंचनामा केला. आता मला दाखविण्यात आलेला घटनास्थळ पंचनामा तोच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. पंचनामा नि.२१ वर आहे. त्यानंतर मी साक्षीदारांचे जबाब तसेच पुरवणी जबाब नोंदविले. सदर पुरवणी जबाब आरोपीं निष्पन्न झाल्याने त्यांची नावे फिर्यादीला कळविले बाबत नोंदविले होते. सदर आरोपींचा सदर गुन्हयातील सहभाग निष्पन्न झाल्याने त्यांना ता. परतुर जि. जालना येथील गुन्हयातुन सदर गुन्हयात वर्ग करुन घेतले. त्याबाबतचे पत्र मला दाखविण्यात आले त्यावर माझी सही आहे. त्यास नि. २५ देण्यात येत आहे. आरोपींना घेऊन गुन्हयातील जप्तीबाबत संभाजी नगर येथील सोनाराकडे गेल्याचे पत्र अभिलेखावर दाखल आहे त्यावर माझी सही आहे. त्यास नि. २६ देण्यात येते. आरोपींनी गुन्हा केल्याचे निष्पन्न झाल्याने त्याचे विरुध्द

न्यायालयात दोषारोपपपत्र दाखल केले. आरोपी आज न्यायालयात हजर नाही मी त्यांना ओळखतो.

सरतपास पूर्ण.

उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. एस. ए. शेख यांचेकडूनः-

२. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळ हे दाट लोकवस्तीचे ठिकाणी आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी प्रत्यक्षदर्शी साक्षीदारांचे जबाब नोंदविले नाही. साक्षीदार सांगतो की, घटनेच्या वेळेस पिडीता एकटीच शतपावली करत होती त्यामुळे तेथे प्रत्यक्षदर्शी साक्षीदार नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, सदर गुन्हयात खोटा तपास करुन खोटे दोषारोपपत्र दाखल केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

३. उलट तपास पुर्ण.

फेर तपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत,
समक्ष,

LAXMIKANT SUDAMRAO PADHEN

Digitally signed by LAXMIKANT SUDAMRAO PADHEN
DN: cn=LAXMIKANT SUDAMRAO PADHEN, ou=BOMBAY HIGH COURT,CID - 6946981, o=BOMBAY HIGH COURT, st=Maharashtra, c=IN
Date: 2026.04.09 13:34:21 +0530

( एल. एस. पाढेण )
मुख्य न्यायदंडाधिकारी
अहमदनगर.

दि. ०९/०४/२०२६
अहमदनगर